**Government Of Maharashtra**
महाराष्ट्र शासन
**Office of the Joint Director of Industries (Mumbai Metropolitan Region)**
उद्योग सह संचालक (मुंबई प्राधिकरण विभाग) यांचे कार्यालय,
Vikas Centre, 702, 7th Floor, Dr. C.G.Marg, Near Basant Cinema, Chembur (East), Mumbai. 400074.
विकास सेंटर, ७०२, ७ वा मजला, डॉ. सी.जी.मार्ग, बसंत सिनेमागृहाजवळ, चेंबूर (पूर्व), मुंबई. ४०००७४.

दूरध्वनी क्रमांक २५२०६१९९/२५२०८१८२ Email:-didic.mumbai@maharashtra.gov.in

दिनांक :- ०७.०९.२०२१.

:- मुंबई उपनगर निर्यात प्रचालन समितीची बैठक दिनांक ०७.०९.२०२१ चे इतिवृत्त -:

मा. जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा निर्यात प्रचालन समिती गठीत करण्याबाबत, शासन, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग यांचे शासन निर्णय क्रम निप्रप-२०२०/ प्र.क्र. २८/ उद्योग-७, दिनांक १९.१०.२०२० मध्ये निर्देश देण्यात आले आहेत. त्यानुसार मुंबई उपनगराकरिता निर्यात प्रचालन समितीची स्थापना करण्याबाबत मा. जिल्हाधिकारी यांची मान्यता घेऊन तसे समिती सदस्य यांना कळविण्यात आले आहे. राज्यातील निर्यातीला चालना देण्याच्या दृष्टीने व उद्योजकांना येणा-या अडचणीचे निराकरण करण्याकरिता तसेच जिल्हयातील निर्यातवाढीसाठी विविध केंद्र व जिल्हा कार्यालये, औद्योगिक संघटना, निर्यात परिषदा, निर्यात सल्लागार इ. यांच्याशी सातत्याने पाठपुरावा, समन्वय व अडीअडचणी दूर करण्याच्या दृष्टीने जिल्हा निर्यात प्रचालन परिषदेस सहाय्य करण्यासाठी मुंबई उपनगराकरिता जिल्हा निर्यात प्रचालन समितीची बैठक दिनांक ०७.०९.२०२१ रोजी दुपारी ३.०० वाजता मा. अतिरिक्त जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांचे अध्यक्षतेखाली कार्यालय समिती सभागृह १० वा मजला, प्रशासकीय भवन, चेतना कॉलेजच्या बाजूला, वांद्रे, (पूर्व), मुंबई. ४०००५१. येथे संपन्न झाली.

१. सर्वप्रथम प्र. उद्योग सह संचालक (मुंप्रावि) यांनी बैठकीस उपस्थितांचे स्वागत करुन निर्यात प्रचालन समिती संदर्भात मुंबई उपनगर जिल्हयाकरिता स्थापन करण्यात आलेल्या निर्यात प्रचालन समितीअंतर्गत करण्यात येणा-या कार्यवाहीबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. प्रस्तावित निर्यात प्रचालन कृती आराखडाबाबत बदल अथवा सूचना तसेच निर्यातसंबंधी काही अडचणी असल्यास त्याबाबत कळविण्याबाबत निर्देश दिले.

२. बैठकीसाठी उपस्थित प्रतिनिधी यांनी विषयासंदर्भात खालीलप्रमाणे मुद्दे उपस्थित केले.

| क्रमांक | प्रतिनिधी | उपस्थित केलेले मुद्दे |
|---|---|---|
| १. | श्रीमती. मृणालिनी इल्हे | जेम्स अँड ज्वेलरी एक्सपोर्ट प्रमोशन कौंसिल यांचे देशभरात साधारण ६००० सदस्य असून त्यातील अंदाजे ८० टक्के हे सुक्ष्म |

| | | |
|---|---|---|
| | | लघु व मध्यम श्रेणीतील उद्योग आहेत. सदर सुक्ष्म लघु व मध्यम उद्योजक यांना त्यांची क्षमतावृध्दी, भांडवल, कच्चा माल आणि Logistic Support इत्यादी अडचणी भासतात. मुंबई मध्ये दहिसर, अंधेरी, मालाड या ठिकाणी जेम्स अँड ज्वेलरी बाबतचे उद्योग स्थापित असून Hall Marking साठी व क्षमतावृध्दीसाठी क्लस्टर स्थापन करुन सुविधा दिल्यास त्याअन्वये निर्यात वृध्दीसाठी मदत मिळेल. |
| २. | श्री. मिथिलेश पांडे | महाराष्ट्रामध्ये कृत्रिम हिरा बनविण्याबाबत कारखाने नसल्याने प्रामुख्याने कच्चा मालासाठी आयातीवर अवलंबून रहावे लागते. त्यामुळे अशा उद्योगासाठी जागा उपलब्ध करुन दिल्यास त्याअन्वये आयातीसाठी पर्याय उपलब्ध होऊ शकेल असे नमूद केले. |
| ३. | श्री. प्रफुल्ल वाल्हे | महाराष्ट्र प्रदूषण मंडळामार्फत परवानग्या मिळण्यासाठी अडचणी निर्माण होत असल्याचे नमूद केले. मुंबईहून जवाहरलाल नेहरु पोर्ट येथे मालाच्या परिवहनासाठी खराब रस्ते व रहदारीमुळे अतिरिक्त वेळ लागतअसून त्यामुळे खर्च वाढतो. व माल वेळेत पोहचण्यासाठी अडचणी येतात. कोवीड १९ लसींची पुरेशी उपलब्धता नसल्याचे त्यांनी नमूद केले.<br>मालासाठी आवश्यक असलेले कंटेनर यांची कमतरता असल्याने त्याची सद्याची किंमत जास्त आहे त्याबाबत अडचणी वरिष्ठ स्तरावर सोडविण्याबाबत त्यांनी नमूद केले. |
| ४. | श्री. अभय दप्तरदार, | केंद्र शासनामार्फत राबविण्यात येणा-या निर्यात प्रचालनविषयीच्या योजनांबाबत समितीस अवगत केले. त्यामध्ये आंतरराष्ट्रीय सहकार्य योजना व निर्यात प्रचालन परिषदेच्या पहिल्यांदा नोंदणीसाठी नोंदणी परतावा योजनेबाबत त्यांनी माहिती दिली. त्याशिवाय जेम्स अँड ज्वेलरीसाठी क्लस्टर योजनेबाबत प्रवर्तक यांनी प्रस्ताव सादर केल्यास त्याव्दारे क्लस्टर स्थापन करणे शक्य होईल असे नमूद केले. |

३. एक जिल्हा एक उत्पादनबाबत मुंबई उपनगर जिल्हयासाठी जेम्स अँड ज्वेलरी प्रस्तावित करण्यात आले. मा. अध्यक्ष, जिल्हा निर्यात प्रचालन समिती तथा मा. जिल्हाधिकारी यांचे अनुमोदनानंतर वरिष्ठ कार्यालयास त्याबाबत कळविण्यात येईल असा निर्णय घेण्यात आला.

सभेअंती सर्व उपस्थित सभासदांचे आभार मानून मा. अध्यक्ष यांचे परवानगीने बैठक संपन्न झाल्याचे जाहिर करण्यात आले.

प्र.उद्योग सह संचालक (मुंप्रावि) तथा सदस्य सचिव
जिल्हा निर्यात प्रचालन समिती

मा. जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर तथा अध्यक्ष
जिल्हा निर्यात प्रचालन समिती

- **बैठकीस उपस्थित सदस्य :-**

| | | |
|---|---|---|
| १. | मा.श्रीमती. निलिमा धायगुडे, | मा. अतिरिक्त जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर |
| २. | श्री. अनिल कणसे | विदेश व्यापार महानिदेशालय, |
| ३. | श्री. अभय दप्तरदार, | संचालक, सूक्ष्म, लघु व मध्यम उपक्रम, अंधेरी |
| ४. | श्रीमती. मृणालिनी इल्हे | जेम्स अँड ज्वेलरी एक्सपोर्ट कौन्सील, सदस्य, मुंबई. |
| ५. | श्री. मिथिलेश पान्डेय, | जेम्स अँड ज्वेलरी एक्सपोर्ट कौन्सील, सदस्य, मुंबई. |
| ६. | श्री. प्रफुल्ल वाल्हे | बेसिक केमिकल्स, कॉस्मेटिक्स अँड डायस एक्सपोर्ट प्रमोशन कौन्सिल, |
| ७. | श्री. सागर नागरे | महाराष्ट्र चेंबर्स ऑफ कॉमर्स असोसिएशन |
| ८. | श्रीमती. मीनल खाडीलकर | बॉम्बे चेंबर्स ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रिज, |
| ९. | श्री अमोल वारखेडे | जिल्हा वस्तू व सेवाकर अधिकारी कार्यालय, |
| १०. | श्री. डी.के.थोरात, | महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, |
| ११. | श्रीमती. वंदना प्रताप | सहयोगी उपाध्यक्ष आर्थिक विकास सल्लागार |
| १२. | श्रीमती. एम.एन.देवराज, | उद्योग सह संचालक (मुंप्रावि), मुंबई. |

जावक क्रमांक उससं/मुंप्रावि//मुंबई उपनगर/जिनिप्रस/बैठक/२०२१/ ३८४८ दिनांक :- 9 SEP 2021

प्रत :-

बैठकीस उपस्थित सदस्य, मुंबई उपनगर.